Annexure II(1),(Vide Article-2.05.06)

## Standing Order no. 15

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.

स्थाई आदेश क्र ०१५

विषय:- वन जमिनीची नोंदवही
फॉर्म नं. १ मध्ये अद्यावत नोंदी घेण्याबाबत सूचना
क्रमांक/मसंभूअफ/स्था.आ./नोंदवही/ ४४१ /२००२-०३
नागपूर-४४० ००६, दिनांक २६ नोव्हेंबर, २००२

१.० मुंबई वन संहिता भाग-२ चे प्रभाग V B अनुच्छेद (Article) ११८ (पृष्ठ क्र. १६२/१६३) मध्ये नमूद तरतूदी व त्या अंतर्गत परिशिष्ट Appendix I (II) (पृष्ठ क्र. २५१) मध्ये दिलेला वनजमिनीचे नोंदवहीचा नमुना विचारात घेता त्यानुसार सदर नमुन्यामध्ये वनजमिनीच्या नोंदी अद्ययावत करून ठेवण्याची जबाबदारी विभागीय वन अधिकारी (सध्या उप-वनसंरक्षक) यांची असून अद्ययावत केलेला अभिलेख फॉर्म नं.१ चे स्वरुपात दरवर्षीचे १ ऑगष्ट रोजी मागील १२ महिण्याचे काळात झालेल्या सुधारणेच्या नोंदीबाबत माहिती देऊन वनसंरक्षकांचे कार्यालयास संक्षिप्त तपशिल सादर करावयाचा असून वृत्तस्तरीय फॉर्म नं.१ मधिल अभिलेख वनसंरक्षकाचे कार्यालयात सुध्दा अद्ययावत (updated) ठेवावयाचे आहेत.

२.० या कार्यालयाकडून विविध वनविभागांचे अभिलेख तपासले असता निरीक्षणाचे वेळी असे निदर्शनास आले की, ठराविक नमुन्यात वन जमिनीची नोंदवही न ठेवता, विभागीय कार्यालये वेगवेगळया नमुन्यात वन जमिनीची नोंदवही ठेवतात, त्यामुळे संपूर्ण राज्यात अभिलेख्यामध्ये एकसूत्रता राहत नाही.

३.०० वन (संवर्धन) अधिनियम, १९८० दिनांक २५-१०-१९८० पासून अमलात आला. त्या कायद्याचे चौकटीत राहून अनेक विकास प्रकल्पाकरीता, वनेतर प्रयोजनाकरीता केंद्र शासनाची परवानगी घेवून वन जमिन वळती करण्यात आली. त्या वळते केलेल्या वनजमिनीचे अनुषंगाने, प्रकल्प यंत्रणेकडून वनखात्याकडे महसूल खात्याकडील वनेतर जमिन किंवा खाजगी व्यक्तीकडून प्रकल्प यंत्रणेने खरेदी करून दिलेली जमिन दिल्या जात. तसेच शासन परिपत्रक एलएनडी १०७६/२१८६/जी-१ /दिनांक १४-४-१९७६ अन्वये महसूल खात्याकडील वनक्षेत्र वनखात्याचे ताब्यात देण्याची कारवाई चालू आहे. तद्वतच झुडपी जंगलाचे वैधानिक स्वरुप केंद्र शासनाचे पत्र क्रमांक ४-८/८७ एफसी / दिनांक १२-२-१९९२ अन्वये स्पष्ट केल्यानंतर व्यवस्थानाचे दृष्टिने योग्य ठरलेले झुडपी जंगल क्षेत्र वनखात्याकडे वर्ग करून त्या क्षेत्राचे राखीव वनात रुपांतरण करण्याची कारवाई हाती घेतली आहे.

४.०० परिच्छेद ३.०० मध्ये नमूद विविध कारणांमुळे वनखात्याकडे येणारे क्षेत्र विचारात घेता वनखात्याकडील वनजमिनीची नोंदवही फॉर्म न.१ मध्ये मुंबई वन संहितेत दिलेल्या विहीत नमुन्यात बदल करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार या नमुना नं. १ मध्ये सुधारणा करण्यात येत असून, यापुढे हि नोंदवही खालील प्रमाणे सुधारित नमुना नं.१ म्हणून ठेवण्यात यावी.

वनजमिनीचे नोंदवहीचा नमुना नं.१ (सुधारित नमुना)

विभाग.......... वनक्षेत्र............ गांव...................

| अ.क्र. | सर्वे नं./ गट नं./ ब्लॉक ई. | क्षेत्र (हे.) | वर्ग राखीव वन संरक्षित वन अवर्गीकृत वन झुडपी जंगल ई. | भारतीय वन अधिनियम १९२७ खाली वनजमाबंदी अधिकारी यांनी नोंदविलेले हक्क | वनजमिनी घोषित झाल्याचा शासकीय अधिसूचनेचा क्रमांक / हस्तांतरणाने प्राप्त झाले असल्यास सक्षम अधिकारी यांचे आदेश क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

| रकाना ६ मधिल अधिसूचना/आदेशा चा दिनांक | वनेतर कामासाठी देण्यात आलेले क्षेत्र (हे.) | वनजमीन वळती करण्याचे आदेश क्रमांक | रकाना ९ मधिल आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० |

५.० प्रत्येक उप-वनसंरक्षकांनी त्यांचे अधिनस्त वनक्षेत्राची नोंद उपरोक्त नमुन्यामध्ये ठेवावी व वेळोवेळी होणाऱ्या अधिसूचना/सुधारणा लक्षात घेऊन त्यानुसार नोंदी अद्ययावत कराव्यात. दरवर्षी ऑगष्ट महिन्याचे १ तारखेला मागील १२ महिन्याचे काळात झालेल्या सुधारणेच्या नोंदीबाबत माहिती देऊन हा सुधारित अभिलेख वनसंरक्षक/ संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालयात सुध्दा पाठवावा. कामकाजात शिघ्रता व एकसूत्रता आणण्याचे दृष्टिने संगणकावर Excel Sheet चे स्वरुपात सुध्दा हा अभिलेख ठेवण्यात यावा व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणेबाबत नोंदी घेण्यात याव्यात. तसेच दरवर्षी किमान एकदा संबंधित उपवनसंरक्षक/उप-विभागीय वन अधिकारी यांनी सदरची नोंदवही तपासून खात्री करावी.

६.० वनसंरक्षक/ संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालयात सुध्दा सदरची नोंद Excel Sheet चे स्वरुपात अद्ययावत ठेवण्यात यावी व त्या अनुषंगाने संबंधित वनसंरक्षक/ मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी दरवर्षी ऑगष्ट महिन्याचे शेवटचे आठवड्यात याबाबत आढावा घेवून अशाप्रकारे नोंदी घेण्यात येतात/ अद्ययावत करण्यात येतात किंवा नाही याबद्दल खात्री करुन घ्यावी व त्यानुसार संबंधित उप-वनसंरक्षकांना वेळीच योग्य ते निर्देश/मार्गदर्शन द्यावे.

सु[illegible]

प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर
व्यवस्थापकीय संचालक, वनविकास महामंडळ मर्या. नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
मुख्य वनसंरक्षक (सर्व)
मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक (सर्व)
वनसंरक्षक (सर्व)
उपवनसंरक्षक प्रादेशिक (सर्व)
उप-विभागीय वन अधिकारी प्रादेशिक (सर्व)

प्रतिलिपी- प्रधान सचिव (वने) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीकरीता सादर.

प्रतिलिपी - मुख्य वनसंरक्षक ( संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे यांचेकडे अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी नमुना नं. १ मधिल उपरोक्त सुधारित नोंदवहीचा मुंबई वन संहिता भाग-२ मध्ये समावेश करण्याची कारवाई करावी.

प्रतिलिपी कक्ष अधिकारी.१०, प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, म.रा. नागपूर यांना ३ प्रतिसह माहितीकरीता रवाना.